टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

विशारद व पारंगत या संस्कृत परीक्षांना मान्यता

महाराष्ट्र शासन
शिक्षण व युवक सेवा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संस्कृत-२२७३/४४०४२-उश
सचिवालय विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक :- ९ एप्रिल, १९७६.

पहा :- शासन निर्णय, शिक्षण विभाग, क्रमांक : संस्कृत १३५०/दिनांक १९ ऑक्टो १९५१
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक : संस्कृत-४४७०/३८८९३-क, (भाग २), दिनांक : २२ जून, १९७३

शासन निर्णय :- वर उद्धृत केलेल्या दिनांक १९ ऑक्टोबर, १९५१ च्या शासन निर्णयान्वये टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या "विशारद" व "पारंगत" परीक्षा माध्यमिक शाळांमध्ये, शैक्षणिक पात्रतेच्या संदर्भात, शिक्षक म्हणून काम करण्यास पात्र ठरविण्यात आल्या. त्यानंतर विद्यापीठाने ह्या परीक्षांच्या अभ्यासक्रमात केलेल्या बदलाबद्दल शासनाकडे तक्रारी आल्या. त्या तक्रारींचा विचार करून व त्यावर राज्यस्तरावरील संस्कृत स्थायी समितीने व्यक्त केलेले अभिप्राय लक्षात घेऊन, शासनाने, पूर्ण विचारांती, खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

(अ) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, यांनी चालू केलेल्या संस्कृत विषयक "पारंगत" अभ्यासक्रमात पूर्वीच्या अभ्यासापेक्षा विशेष फरक नसल्याने सदर पदवी अभ्यासक्रमास पूर्वी संमत केलेल्या शैक्षणिक पात्रतेच्या संदर्भात मान्यता देण्यात येत आहे,

(ब) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांनी चालू केलेल्या संस्कृत साहित्य "विशारद" परीक्षेचा पहिला सुधारित (१९ प्रश्न पत्रिका) अभ्यासक्रम, पूर्वी संमत केलेल्या पात्रतेच्या संदर्भात, अमान्य करण्यात आला आहे. दुसऱ्यांदा दुरुस्त केलेला व १९७२ पासून चालू असलेला (२२ प्रश्न पत्रिका) संस्कृत साहित्य "विशारद" अभ्यासक्रमास मान्यता देण्यात येत आहे,

(क) सुधारित परंतु शासनाने मान्य न केलेला अभ्यासक्रम (संस्कृत साहित्य विशारद-१९ प्रश्नपत्रिका) घेऊन परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मान्य अभ्यासक्रमाचे [illegible] घ्यावयास सांगावे. मात्र अशा विद्यार्थ्यांना, जे माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून काम करीत असतील, त्यांना पूर्वी "विशारद" म्हणून वेतन दिलेले असल्यास ती दिलेली रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात येऊ नये, वसूल करून तो सरकारी तिजोरीत जमा करावी. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि विभागीय शिक्षण उपसंचालक, यांनी योग्य ती कार्यवाही करावी व त्या संबंधीचा अहवाल शासनाच्या माहितीसाठी सादर करावा,

(ड) यापुढे अशा प्रकारांमध्ये शासनाची पूर्व संमती न घेता मान्य परीक्षांच्या प्रचलित संमत अभ्यासक्रमात सुधारणा करू नये. शिक्षण संचालकांनी या संबंधी सर्व संबंधित संस्था चालकांना योग्य त्या सूचना द्याव्यात.

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संमतीने काढण्यात आला आहे.
(पहा अनौपचारिक संदर्भ क्रमांक :सीआर् ४४१/एसईआर् १/७५/९९८ इस्टापी-५, दिनांक २९ नोव्हें १९७५)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(शि. वा. टेंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति-

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, १ मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, २ नागपूर
कोषागार अधिकारी, पुणे
श्री. गो. ह. पिंपळखरे, नियंत्रक स्थायी संस्कृत समिती व शिक्षण सहसंचालक (संस्कृत विभाग) शिक्षण संचालनालय, पुणे.
रजिस्ट्रार, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
कार्यासन ४, शिक्षण व युवक सेवा विभाग.

परेरा/०४०६.